ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३२ | पुणे, बुधवार २० एप्रिल, १९६६ | अंक ८

## नहीं—
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और न्यायालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुवदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड
सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना :

# विविध माहिती

**शेतीच्या अवजारांचा वापरच नाही**—भारतामधील शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करणे अपरिहार्यच आहे. अनेक परदेशांकडून शेतीची आधुनिक अवजारे मागविण्यात येतात. पण ती पुष्कळदा तशीच पडून राहतात. १९५२ ते १९५९ ह्या काळात परदेशांकडून मिळालेल्या अशा यंत्रसामग्रीपैकी ४६·२२ लाख रुपये किमतीच्या यंत्रसामग्रीचा वापरच राज्य सरकारांनी १९६० पर्यंत केलेला नव्हता. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय विकास संघटनेने ही गोष्ट उघडकीस आणल्यावर यंत्रसामग्रीचा वापर करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

**हंगेरीसाठी रेल्वेचे डबे**—येत्या तीन वर्षांच्या काळात भारत हंगेरीला रेल्वेच्या २ हजार मालवाहू डब्यांचा पुरवठा करणार आहे. त्यांची किंमत सुमारे ६·५ कोटी रुपये होईल. युरोपातील देशाला रेल्वेचा माल पुरविण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि हंगेरीची व्यापारी संघटना ह्यांनी करार केला आहे.

**आशियातील देशांना लागणारी मदत**—जपानच्या परराष्ट्र खात्याने आशियातील १३ देशांना येत्या १० वर्षांत लागणाऱ्या मदतीचा अंदाज केला आहे. ह्या अंदाजाप्रमाणे ह्या अवधीत त्यांना १,१२० कोटी डॉलर्सची मदत लागणार आहे. भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ, कंबोडिआ, सिलोन इत्यादी देशांचा ह्या १३ देशांत समावेश आहे.

**जपानची संरक्षण सिद्धता**—जपानने आपली संरक्षण सिद्धता वाढविण्यास प्रारंभ केला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानला लष्करी विमाने बांधण्यास प्रतिबंध करण्यात आला होता. परंतु आता तो लागू नाही. ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने जाणारे एक शिकाऊ लष्करी विमान तयार करण्याचा हुकूम जपानच्या संरक्षण खात्याने काढला आहे.

**पाकिस्तान-चीनमधील खुष्कीचा व्यापार**—पाकिस्तानने व्यापलेल्या काश्मीरच्या भागातील हुंझा आणि चीनमधील काश्गर ह्यांच्या दरम्यान उंटांच्या तांड्याचा एक जुना मार्ग आहे. चीनने सिंकिअँग प्रांत व्यापल्यावर गेली १६ वर्षे हा मार्ग बंद करण्यात आला होता. परंतु आता लवकरच हा मार्ग चालू करण्यात येणार आहे. चीन व पाकिस्तान ह्यांच्यामधील जमिनीवरील वाहतुकीचा हा मार्ग महत्त्वाचा ठरण्याचा संभव आहे.

**युगोस्लाव्हिआचे भारताला कर्ज**—चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी मदत म्हणून युगोस्लाव्हिआने भारताला ८ कोटी डॉलर्सचे कर्ज देण्याचे मान्य केले आहे. भारताने कर्ज स्वीकारले असून त्याचा उपयोग करून उभयता देशांतील आर्थिक व व्यापारी देवाण-घेवाण वाढविण्यात येणार आहे. उभयता देशांत सध्या होणाऱ्या व्यापारापेक्षा येत्या दोन वर्षांत होणाऱ्या व्यापाराचे स्वरूप अधिक विविध प्रकारचे होईल. निर्यात व्यापारात पक्का माल, औद्योगिक कच्चा माल आणि अर्धसंस्कारित माल ह्यांचे प्रमाण वाढत जाईल. भारताला तांत्रिक ज्ञान, यंत्रसामग्री आणि इतर साधने ह्यांचा लाभ होईल.

**ऑस्ट्रियातील चर्चेसनी केलेली मदत**—मार्च महिन्यातील अखेरच्या शनिवारी ऑस्ट्रियातील प्रार्थना मंदिरांनी भारताला मदत देण्यासाठी तासभर घंटानाद चालू ठेवला होता. मंदिराबाहेर मदतीच्या पेट्या ठेवण्यात आल्या होत्या. घंटानादाला भाविकांनी चांगला साद दिला. सुमारे १० हजार खिस्ती भाविकांनी पेट्यांत मदतीचे पैसे टाकले. वृत्तपत्रांनी भारतामधील दुष्काळी परिस्थितीबद्दल लेखही प्रसिद्ध केले होते.

**जपानी मुलांना खाण्याचे शिक्षण**—दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जपानी लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयीत विलक्षण बदल घडून आलेले आहेत. पूर्वी लोक मासे आणि भात दोन लांब काड्यांच्या साह्याने खात असत. पण अलीकडे युरोपीय देशांप्रमाणे मांसाहार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. असा आहार करण्यासाठी जपानी मुलांना काट्या-चमचाने भोजन करण्याचे धडे मुद्दाम देण्यात येत आहेत.

**आशिया विकास बँक**—आशिया विकास बँकेच्या भांडवलापैकी ५० लाख डॉलर्सचे भांडवल पुरविण्याचे स्वित्झरलंडच्या सरकारने जाहीर केले आहे. ह्या बँकेचे एकूण भांडवल १०० कोटी डॉलर्स असून त्यातील ६५ कोटी डॉलर्सचे भांडवल आशियातील देश पुरविणार आहेत. जपानने २० कोटी, भारताने ९·३ कोटी, ऑस्ट्रेलियाने ८·५ कोटी आणि पाकिस्तानने ३·२ कोटी डॉलर्स भांडवलाची हमी घेतली आहे.

**मोठ्या शेतीसाठी यंत्रसामग्री**—भारतापुढील अन्न प्रश्न सोडविण्याच्या कामी मदत म्हणून रशियाकडून आधुनिक पद्धतीची शेतीची यंत्रसामग्री मिळण्याचा संभव आहे. पाच मोठ्या शेतवाड्यांना पुरेल इतकी यंत्रसामग्री रशियाकडून कदाचित देणगी म्हणूनही मिळण्याची शक्यता आहे.


## भोंगा असलेली पिशवी......

मोठमोठ्या रकमा नेण्याकरिता काही ठिकाणी एका विशिष्ट पद्धतीची पिशवी वापरतात. जर कोणी ही पिशवी हिसकावून घेतली तर त्यामधील भोंगा वाजू लागतो आणि चोराला तो थांबविता येत नाही.

यासारख्या सुरक्षिततेसाठी सूज्ञ लोक आपले अधिकांत अधिक आर्थिक व्यवहार बँकांमार्फत करतात. 'बँकिंग' ची सवय ही अत्यावश्यक आणि चांगली सवय आहे. त्यातल्यात्यात बेळगांव बँकेशी व्यवहार करण्याची सवय तर फारच लाभदायक; कसे ते अवश्य विचारा.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

[ शेड्यूल्ड बँक ]

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव.

# अर्थ

बुधवार, २० एप्रिल, १९६६



*संस्थापक :*
प्रा. वामन गोविंद काळे
*संपादक :*
श्रीपाद वामन काळे


## बँकांवर आणखी बंधनांना वाव तरी कुठे आहे ?

सागर विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाचे वेळी नियोजन मंत्री श्री. अशोक मेहता ह्यांनी आपल्या भाषणात हिंदी बँकिंग संबंधी जे नुकतेच वक्तव्य केले, त्याला इंडियन बँक्स असोसिएशनचे चेअरमन, श्री. कृष्णराज ठाकरसी, ह्यांनी असोसिएशनच्या वार्षिक सभेत अध्यक्षपदावरून बोलताना दि. ११ रोजी सडेतोड उत्तर दिले आहे. "बँकांनी दिलेल्या कर्जापैकी दोन तृतीयांश रक्कम ६५० खात्यांनी उचललेली आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी अँटी–ट्रस्ट कायदे करायला हवेत, का सरकारने ह्या जबरदस्त संस्थांत हस्तक्षेप करायला हवा, ह्याचा विचार करण्याची वेळ आली आहे. त्याचप्रमाणे, बँकिंग क्षेत्रावरील सरकारी निर्बंध सामाजिक हिताच्या दृष्टीने आणखी कडक करायला हवेत किंवा काय, हेही तपासून पाहिले पाहिजे" अशा अर्थाचे उद्‌गार श्री. अशोक मेहता ह्यांनी काढले होते.

श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनी ह्या विचारांचा परामर्श घेताना विचारले, "श्री. मेहता ह्यांचे ६५० कर्ज खात्यांविषयक म्हणणे खरे मानले, तरी हिंदी बँकांचे विद्यमान धोरण व त्यांची कामगिरी ह्याला ते बाधक कुठे ठरते ?" भारतात मोनॉपोलीचे विषयी अस्तिपक्षी मत देण्याला मोनॉपोलीज कमिशनलाही पुरावा सापडला नाही. नियोजन मंडळाने आणि भारत सरकारने मोठ्या कंपन्या अस्तित्वात येऊ दिल्या, त्यांना भांडवल उभारू दिले, त्यांना कारभार चालवू दिला. राष्ट्रीय धोरणाचा एक भाग म्हणून अशा कंपन्या चालू असताना त्यांची भांडवल-विषयक गरजही प्रचंड असणार आणि अशा मोठ्या कंपन्यांची ती गरज बँकांनी भागविली तर सरकारी धोरणाशी ते सुसंगतच नव्हे काय ? ह्या मोठ्या कंपन्यांपैकी कित्येक कंपन्या सरकारी क्षेत्रातल्या आहेत. ६५० कंपन्यांपैकी किती कंपन्या सरकारी क्षेत्रातल्या आहेत व त्यांचे भांडवल व बँक–कर्ज किती आहे, ह्याची चौकशी श्री. मेहता ह्यांनी सोईस्करपणे केलेली नाही.

खाजगी क्षेत्रातील बँकांनीच मोठाली कर्जे दिलेली नाहीत; सरकारी क्षेत्रातील बहुतेक कंपन्या आणि खाजगी क्षेत्रातील कित्येक बड्या कंपन्या ह्या स्टेट बँकेकडून व तिच्या दुय्यम संस्थांकडून कर्जे घेत असतात. तेव्हा, श्री. मेहता ह्यांची टीका सरकारी मालकीच्या बँकांनाही लागू आहे. बँकांवरील सरकारी नियंत्रण वाढविण्याचा उपाय श्री. मेहता ह्यांनी सुचविला, तो अमलात आणल्याने त्यांची 'तक्रार' दूर होण्याजोगी नाही.

लहान कर्जदारांची गरज बँकांकडून पुरेशी भागविली जात नाही, असा निष्कर्ष श्री. मेहता ह्यांच्या आकड्यांवरून निघू शकत नाही. स्टेट बँकेप्रमाणे खाजगी क्षेत्रातील बँकाही लहान कर्जदारांना मदत करण्याचा विविध प्रकारे प्रयत्न करीत आहेत; त्यांच्या विशिष्ट अडचणींकडे विशेष लक्ष पुरवीत आहेत. लहान उद्योगधंदेवाल्यांसाठी कित्येक बँकांनी स्वतंत्र खाती निर्माण केली आहेत व त्यासाठी खास अधिकारी वर्ग नेमला आहे. परंतु अशा उद्योगधंदेवाल्यांची व्यक्तिगत गरज अल्प असल्यामुळे व बँक-कर्जाचा उपयोग करण्याची क्षमताही मर्यादित असल्यामुळे त्या सर्वांना मिळून दिल्या गेलेल्या कर्जाचा आकडा एकूण कर्ज-पुरवठ्याच्या मानाने मोठा असणे शक्यच नाही.

बँकिंगवरील रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आजच किती प्रभावी आहे, ह्याची श्री. मेहता ह्यांनी दखलच घेतलेली नाही; रिझर्व्ह बँकेचे ह्या बाबत अधिकार अपुरे आहेत, असे श्री. मेहतांनी किंवा इतरही दुसऱ्या कुणी कुठेच म्हटलेले नाही. बँकिंग लॉज (मिसलेनिअस प्रोव्हिजन्स) कायद्याखाली रिझर्व्ह बँकेला आणखी कितीतरी व्यापक अधिकार मिळालेले आहेत. त्यामुळे आता रिझर्व्ह बँकेची बँकिंग क्षेत्रावरील कायदेशीर पकड पक्की झाली आहे; श्री. मेहता सुचवितात त्याप्रमाणे ती वाढविण्यास आता जवळजवळ जागाच उरलेली नाही. ही झाली कायदेशीर अधिकाराची परिस्थिती; रिझर्व्ह बँकेचे नेतृत्व हिंदी बँका व नाणे-बाजार प्रथम पासूनच मान्य करीत आले आहेत; रिझर्व्ह बँकेच्या इच्छेला आणि सूचनांना त्यांनी नेहमीच मान दिलेला आहे—कायद्याने त्याची आवश्यकता असो वा नसो.

आपली इच्छा बँकिंग क्षेत्रावर लादण्यास रिझर्व्ह बँक आणि सरकार ह्यांस भरपूर कायदेशीर अधिकार आहेत; पुरेसे नेतृत्व करून हितकारक दडपण आणण्याची त्यांची पात्रता आहे; असे इंडियन बँक्स असोसिएशनचे स्पष्ट मत आहे; बँकिंगवरील सरकारी अधिकार वाढविण्यास वाव नाही आणि गरजही नाही; बँकांचे व्यवहार व कर्जविषयक धोरणे ह्यांना श्री. अशोक मेहता ह्यांचे उद्‌गार पूर्णपणे गैरलागू आहेत,: असे श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनी स्पष्ट केले.

---

### अमेरिकन सैनिकांमुळे सिंगापूरला प्राप्ती

सिंगापूरला सुटीसाठी येणाऱ्या अमेरिकन हौशी प्रवाशांमुळे तेथील धंदेवाल्यांना चांगली बरकत होत आहे. हे प्रवासी म्हणजे व्हिएटनाममध्ये युद्धात भाग घेणारे अमेरिकन सैनिक असून ते साध्या पोषाखात येऊन ५ दिवसांच्या रजेत मजा करून परत जातात. सिंगापूरच्या हौशी प्रवासी कमिटीने अमेरिकन सरकारशी बोलणी करून ही व्यवस्था केली आहे. मात्र सिंगापूरचे सरकार त्यांना खास अशा सवलती देणार नाही. प्रत्येक अमेरिकन प्रवासी सिंगापूरमधील आपल्या ५ दिवसांच्या भेटीत सुमारे ४०० डॉलर्स तरी खर्च करतो असा अंदाज आहे. परत जाताना साध्या पोषाखातील हे अमेरिकन सैनिक अनेक प्रकारच्या वस्तू आठवणीसाठी म्हणून बरोबर नेतात. सिंगापूरवर 'स्वारी' केलेल्या ह्या अमेरिकन हौशी प्रवाशांमुळे तेथील धंद्यांना १ लाख डॉलर्सची किफायत होऊ शकेल.

---

### अर्थव्यवस्थेचा प्रत्येक विभाग संकटात आहे

लोकसभेचे सदस्य आणि स्वतंत्र पक्षाचे एक पुढारी श्री. एन. दांडेकर ह्यांनी हिंदी अर्थ व्यवस्थेवर पडलेल्या संकटाच्या ग्रावलीसंबंधी इशारा दिला आहे. माहीम येथे एका माळ्या जाहीर सभेत बोलताना ते म्हणाले की हिंदच्या अर्थव्यवस्थेच्या सद्य-स्थितीचा विचार करू लागता त्यातील प्रत्येक विभागावर तीव्र स्वरूपाच्या अरिष्टाची छाया पडलेली दिसून येते. अर्थव्यवस्थेच्या नाडीचे ठोके अधिकाधिक क्षीण पडू लागलेले आहेत. पश्चिमेकडील देश, जपान आणि राष्ट्रकुल संघातील देश भारताच्या मदतीला धावून त्यांनी जर भारताला वाचविण्याची मोठी मोहीम अंगावर घेतली नाही तर ही अर्थव्यवस्था मृतप्राय होण्याची शक्यता आहे. अर्थव्यवस्थेच्या क्षितिजावर सर्वत्र गंभीर अडचणींचे ढग जमलेले आहेत. परदेशीय चलनाचा तुटवडा अतिशय आहे; शेती आणि उद्योगधंदे ह्या दोन्ही विभागांत उत्पादन घटत जाण्याची प्रवृत्ती जोर करू लागली आहे. बचत होण्यातही घट होत आहे. त्याचप्रमाणे भांडवलाचा संचय व गुंतवणूक धोका वाटण्याइतकी कमी होत चालली आहे. भांडवलाची बाजारपेठ जवळजवळ थंडावलीच आहे. भूमिहीन मजूर, मध्यम वर्ग, विधवा स्त्रिया व पोरकी मुले, सेवानिवृत्त झालेले लोक, ह्यांची स्थिती तर अनुकंपनीय झाली आहे. कारण, त्यांचे उत्पन्न स्थिर असते; आणि ह्या सर्वांवर ताण म्हणजे देशात सर्वत्र अविश्वासाचे वातावरण निर्माण झालेले आहे. एका प्रकारच्या नैतिक अधःपाताने देश पछाडला गेलेला आहे. त्यातच राजकीय गोंधळाचीही भर पडली आहे.

---

### इंडोनेशियाची अर्थव्यवस्था मोडकळीस आली

इंडोनेशियाची अर्थव्यवस्था मोडकळीस आल्याने तेथील नव्या सरकारला कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. गेल्या चार-सहा महिन्यांत झालेल्या राजकीय घडामोडीमुळे अर्थव्यवस्थेवर आणखीच ताण पडलेला आहे. कर्जाचे ओझे इतके झाले आहे की त्यावरील व्याज देण्यासही पैसा अपुरा पडत आहे. निर्यातीत इतकी घट झाली आहे की अत्यंत जरूरीचा माल परदेशातून आयात करण्यासाठी लागणारे परदेशीय चलनही मिळणे दुरापास्त झाले आहे. देशातील वाहतुकीची साधने व मार्ग अतिशय विस्कळीत झालेले असल्याने परदेशी पाठविण्याचा माल बंदरापर्यंत वाहून नेणे अतिशय अवघड व विलंबाचे झाले आहे. इंडोनेशिया हा देश अनेक बेटांचा असल्यामुळे सागरी वाहतुकीला खूप महत्त्व आहे. लोकांच्या खाण्यातील मुख्य अन्नपदार्थ म्हणजे तांदूळ; पण तो अंतराअंतरावर पसरलेल्या बेटांतून जाव्हा बेटांत आणणे अशक्य झाले आहे. दरम्यान जाव्हाची लोकसंख्या मात्र भरमसाठ वाढलेली आहे. इंडोनेशियाला परदेशांचे कमीतकमी २५० कोटी डॉलर्सचे कर्ज आहे. अनेक देशांनी इंडोनेशियाला लष्करी माल पुरविलेला आहे, अगर रोज खपाचा माल पतीवर पुरविलेला आहे पण, ह्या कर्जाची फेड करणे बिकट झालेले आहे. चालू वर्षीचे परदेशीय कर्जावरील व्याज आणि गेल्या वर्षी थकलेली बाकी ह्यांच्यासाठीच इंडोनेशियाला ४७ कोटी डॉलर्सची गरज आहे. ही परिस्थिती निभावून नेण्यासाठी इंडोनेशियाच्या सरकारला कर्जतहकुबी मागावी लागेल आणि चलनवृद्धी आटोक्यात आणावी लागेल. त्याचप्रमाणे तुटीची अंदाजपत्रके तयार करण्याचे बंद करून लष्करावरील खर्चातही कपात करावी लागेल.

### जागतिक बँकेचा मदतीचा नवा कार्यक्रम

जागतिक बँकेने अविकसित देशांचा आर्थिक विकास साधण्यासाठी ३० कोटी डॉलर्स अथवा १४०.५० कोटी रुपये खर्च येणारा एक नवा कार्यक्रम तयार केला असून तो भारत सरकारकडे विचारासाठी पाठविला आहे. अविकसित देशांतून निर्यात होणाऱ्या मालात घट झाली की त्यांच्या विकासाच्या गतीवर परिणाम होतो असा अनुभव येतो. पुष्कळदा निर्यातीमधीलही घट इतकी वेगाने व अनाकलनीय कारणाने होते की निर्यातवाले देश त्याबद्दल काहीही उपाययोजना करू शकत नाहीत. अविकसित देशांना विकास करून घेण्यासाठी परदेशांतून अनेक प्रकारच्या मालाची आयात करावी लागते. ह्या मालासाठी द्यावे लागणारे परदेशीय चलन अप्रगत देशांना कच्चा माल निर्यात करून मिळवावे लागते आणि निर्यात मालापैकी ५० टक्के माल शेतीचा असतो. निर्यातीमुळे मिळणाऱ्या परदेशीय चलनाच्या प्राप्तीत थोडीशी जरी प्रतिकूलता निर्माण झाली तरी अविकसित देशांचे आर्थिक कार्यक्रम विस्कळीत होतात आणि आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यासाठी अल्पकालीन कर्जांची सोय केली तरी त्यामुळे फारसा उपयोग होत नाही याची जाणीव बँकेला झालेली आहे. जागतिक बँकेशी संलग्न असलेली आंतरराष्ट्रीय विकास संघटना बँकेची नवीन योजना अमलात आणणार आहे. एखाद्या अविकसित देशाने काही विवक्षित ठरवून दिलेल्या पातळीपेक्षा अधिक निर्यात केली तर त्या पातळीपेक्षा अधिक केलेली निर्यात, निर्यातीत घट झालेल्या कालातील निर्यातीपोटी धरली जाईल. हा काल सामान्यतः ५ वर्षांचा असेल. आंतरराष्ट्रीय व्यापारातील चढउतार लक्षात घेऊन बँकेने ही नवी योजना आखली असून तिचा फायदा फक्त सभासद-देशांनाच मिळू शकेल.

---

### धूम्रपानामुळे आरोग्यावर होणारा परिणाम

धूम्रपानाच्या व्यसनामुळे आरोग्यावर घातक परिणाम होतात असे मत अमेरिकन सरकारने नेमलेल्या एका कमिटीने व्यक्त केलेले आहे. ह्या व्यसनामुळे कॅन्सर सारखा असाध्य रोग होण्याचा बळकट संभव असतो, हे सामान्यपणे मान्य करण्यात आलेले आहे. तथापि धूम्रपानाच्या सवयीमुळे होणाऱ्या विपरीत परिणामांची अलीकडे आणखी एक राष्ट्रीय पाहणी अमेरिकेत करण्यात आली आहे. तीवरून असे दिसते की धूम्रपानामुळे नागरिकांच्या आरोग्याला तर बाधा पोचतेच; पण ह्या सवयीचा अर्थव्यवस्थेवरही वाईट परिणाम होतो. अमेरिकेत धूम्रपानाच्या व्यसनाच्या आहारी गेलेला एकही नागरिक नसता तर कमी-अधिक कायम स्वरूपाच्या दुखण्याने छाडलेल्या रोग्यांच्या संख्येत १.२ कोटीची घट झाली असती. धूम्रपानाच्या सवयीमुळे एरव्हीपेक्षा ३ लाख अधिक लोकांना रक्तवाहिन्यांचे विकार होतात, १० लाख लोकांना घशाचे विकार होतात आणि २० लाख लोकांना सर्दी होऊन चेहऱ्याच्या नसा सुजतात. त्याशिवाय १० लाख लोकांना आंतड्यातील व्रणांचा विकार संभवतो. इतक्या मोठ्या प्रमाणावर विकारग्रस्त होण्यामुळे ह्या लोकांच्या रोजगारीवर परिणाम होणे अटळच आहे. नागरिकांच्या आजारांमुळे एरव्हीपेक्षा ३० लाख अधिक दिवस पुरेसे काम होत नाही आणि ९ लाख अधिक कामाचे दिवस वाया जातात. ह्याचा अर्थ असा की सिगरेट ओढण्याच्या व्यसनापायी अमेरिकेला लोकांच्या आरोग्याच्या अभावाच्या स्वरूपात खूप मोठी किंमत द्यावी लागतेच. पण त्याचबरोबर अकाली मृत्यू, दुखणी, उपचारांची किंमत ह्यांच्या रूपानेही मोठी आर्थिक हानि सोसावी लागते. वाया गेलेल्या कामाच्या दिवसाच्या रूपाने कोट्यावधी डॉलर्स बुडतात.

## संयुक्त राष्ट्र संघटनेचा वाढता खर्च

सयुंक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी १४ सभासदांची एक कमिटी नेमण्यात आली होती. ह्या कमिटीने आपला अहवाल सरचिटणिसांना आता सादर केला आहे. कमिटीने दिलेल्या माहितीवरून असे आढळून आले आहे की संघटना चालू ठेवण्याचा खर्च गेल्या १२ वर्षांच्या काळात २३ पटींने वाढला आहे. १९५४ साली संघटनेने ४ कोटी, ६८ लाख डॉलर्स खर्च केले आहेत. १९६६ साली संघटनेच्या नेहमीच्या अंदाजपत्रकात १२ कोटी, १५ लाख, ६७ हजार डॉलर्स खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. २५ मार्च अखेर संघटनेला असलेल्या कर्जाची माहितीही अहवालात देण्यात आली आहे. ह्या माहितीप्रमाणे संघटनेला ३ कोटी, १९ लाख डॉलर्स ते ५ कोटी, ३३ लाख डॉलर्सच्या दरम्यान कर्ज होते. संघटनेच्या शांतता रक्षणार्थ होणाऱ्या खर्चातील वर्गणी देण्याबाबत काही बडी राष्ट्रे खळखळ करीत आहेत.

## मुलामुलींच्या वाढीची गती का वाढली

जीवशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांपुढे एक नवा प्रश्न उभा राहिला आहे. अलीकडील काही वर्षांत मुलामुलींच्या वाढीचा वेग वाढला असून त्यांच्या कारणाबद्दल या शास्त्रज्ञांना जिज्ञासा वाटणे साहजिक आहे. गेली १०० वर्षे करण्यात आलेल्या पाहाण्यावरून असे आढळून आले आहे की माणसाची उंची सरासरी ३ ते ४ इंचांनी वाढलेली आहे. त्यातल्या त्यात जे देश सुस्थितीत आहेत त्या देशांतील माणसाची उंची वाढल्याचे विशेषेकरून ध्यानात येते. शहरात राहणाऱ्या मुलामुलींची शारीरिक वाढ अधिक वेगाने होते, असेही दिसून येते. मुलामुलींचे वयात येण्याचे वय कमी झालेले आहे. एका शतकापूर्वी युरोपमधील मुली १६ व्या अगर १७ व्या वर्षी वयात येत. आता त्या १३ अगर १४ व्या वर्षीच वयात येतात.

## आग्नेय आशियाला भरीव मदतीची जरूरी

अमेरिकेचे उपाध्यक्ष मि. हंफ्रे, आग्नेय आशियातील देशांचा दौरा आटोपून नुकतेच परत गेले. अमेरिकेतील दूरचित्रवाणीवर मुलाखत देताना ते म्हणाले की आग्नेय आशियातील देशांना युरोपमधील देशांना देण्यात आलेल्या मार्शल मदत योजनेप्रमाणे कोट्यावधी डॉलर्सची मदत द्यावयाची जरूरी आहे. अशी मदत फक्त युद्धग्रस्त व्हिएटनाम देशालाच पाहिजे आहे असे नाही. भारत, पाकिस्तान, कांबोडिया, लाओस, थायलंड इत्यादी देशांनाही मदतीची फार गरज आहे. आशियातील देश ह्या मदतीचा उपयोग संयुक्त रीत्या करण्यास तयार होण्याची शक्यता आहे. कारण, प्रत्येक देशांत तशी इच्छा दिसून येते. अमेरिकेने ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन मदतीचे कार्य केले पाहिजे.

## मॅनेजिंग एजन्सीवरील बंधने आवळली जाणार

" मॅनेजिंग एजन्सी पद्धत अजिबात बंद करावी काय, ह्या संबंधी भारत सरकारचा विचार चालू आहे. तूर्त, सध्याच्या कायद्याचा उपयोग करून त्या पद्धतीवरील बंधने आवळण्यात येत आहेत. काही मॅनेजिंग एजन्सीजच्या कराराची मुदत १० आणि १५ वर्षांनी वाढविण्यात आली आहे. त्यांचा फेरविचार करण्यात येईल " असे विधिमंत्री श्री. जी. एस्. पाठक ह्यांनी लोकसभेत सांगितले.

## चीनला पश्चिम जर्मनीची मदत

चीनमध्ये एक मोठा पोलादाचा कारखाना काढण्यासाठी पश्चिम जर्मन सरकारने ८७५ कोटी डॉलर्सचे कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १५ कोटी डॉलर्स खर्च येणार असून ह्या कामात पश्चिम युरोपातील फ्रेंच, ब्रिटिश, इटालिअन आणि स्विस कंपन्याही काही प्रमाणात भाग घेणार आहेत. पश्चिम युरोपातील देशांकडून एकाच व्यवहारात इतका मोठा कारखाना चीनला पुरविण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. कारखाना उभारण्याचे काम ५ वर्षांत पुरे करण्यात येणार आहे. पश्चिम जर्मनीने चीनला ह्यापूर्वीही १·५ कोटी डॉलर्सचे कर्ज देऊन एका रासायनिक व एका पोलादाच्या कारखान्याची उभारणी केली आहे. चीनने इतर काही कारखान्यांच्या किंमती मात्र रोखीने दिल्या आहेत.

## हस्तिदंती वस्तूंच्या निर्यातीला वाढती स्पर्धा

हस्तिदंतापासून तयार केलेल्या वस्तूंच्या निर्यात व्यापारात भारताला चीन, जपान आणि हाँगकाँग ह्या देशांकडून होणाऱ्या स्पर्धेला वाढत्या प्रमाणावर तोंड द्यावे लागत आहे. हस्तिदंताच्या वस्तू निर्यात करण्यासाठी भारत सरकार आर्थिक मदत देत असते. तरी सुद्धा वरील देश भारताच्या मालापेक्षा कमी किमतीत हा माल जागतिक बाजार पेठेत धाडीत आहेत. हस्तिदंताच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणारे हस्तिदंत भारताला जवळ जवळ सर्वच आयात करावे लागते आणि त्याची तर सध्या अतिशय टंचाई आहे. त्यामुळे हस्तिदंताच्या किमती बेसुमार वाढल्या आहेत. परिणामी हस्तिदंताच्या मालाच्या किमतीही त्या प्रमाणात फुगलेल्या आहेत. याचा परिणाम निर्यातीच्या मालावरही झाला आहे. भारताला दरसाल ६० लाख रुपयांचे हस्तिदंत लागते. पण जेमतेम २० लाख रुपयांचेच मिळू शकते.

## १ पैसेवाली ८ कोटी तिकिटे निष्कारण छापावी लागली

१ मे, १९६३ पासून पोस्टकार्डाचे हशिल ५ पैशांचे ६ पैसे करण्यात आले. परंतु, वेळेवर ६ पैसेवाली कार्डे छापून झाली नाहीत, इतकेच नव्हे तर त्या महिन्यात ५ पैसेवाल्या कार्डांची छपाई चालूच राहिली; जुन्या दराची ८ कोटी, ६ लक्ष कार्डे छापण्यात आली. ६ पैसेवाल्या कार्डांची छपाई सुरू झाल्या नंतरही २ कोटी, ४ लक्ष जुन्या दराचीच कार्डे छापली गेली! साहाजिकच, १ पैसेवाली ८ कोटी, ६ लक्ष तिकिटे जादा छापावी लागली. त्यावर ८९,५०० रु. खर्च झाला, तो टळण्याजोगा होता; वेळेवर ६ पैसेवाली कार्डे छापली असती तर!

## कनिष्ठ दर्जाच्या मँगेनीजची निर्गत

म्हैसूरमधील बोर्ड ऑफ मिनरल डेव्हलपमेंट ह्या सरकारी संघटनेबरोबर एका विदेशी कंपनीने मँगेनीजच्या खनिजाच्या पुरवठ्याबाबत केलेला करार रद्द केला; कारण, कराराप्रमाणे शुद्धतेचे खनिज पुरविण्याऐवजी बोर्डाने कनिष्ठ दर्जाचे खनिज निर्गत केले. विदेशी कंपनीने खनिजाचा दर टनामागे ६ रुपये कमी केला आणि बाकीच्या पुरवठ्याचा करार रद्द केला.

## युनेस्को कुरिअरची तमीळ आवृत्ती

'युनेस्को'च्या कुरिअर ह्या मासिकाची तमीळ आवृत्ती मद्रास येथे निघू लागणार आहे. शिक्षण, शास्त्र, संस्कृतिविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्यास वाहिलेले हे मासिक पॅरिस येथे प्रसिद्ध होत असते. सध्या त्याच्या आठ भाषांतून आवृत्त्या प्रसिद्ध होत असतात; हिंदी आवृत्तीही प्रसिद्ध होण्याच्या वाटाघाटी चालू आहेत.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचे काम**—१९६५-६६ सालात आयुर्विमा कॉर्पोरेशनने ८०० कोटी रुपयांहून अधिक नवे काम मिळविले. मागील वर्षाशी तुलना करता, ह्या वर्षी ९९ कोटी रुपयांचे अधिक काम पूर्ण करण्यात आले आहे. कॉर्पोरेशनकडे आयुष्याचा विमा उतरण्यासाठी १६.२९ लाख अर्जे आले. त्या सर्वांची मिळून रक्कम ८३८ कोटी रुपयांची होते. नवीन आलेल्या कामापैकी ९५.४ टक्के काम पूर्ण करण्यात आले. कॉर्पोरेशनच्या मुंबई विभागाने १०५ कोटी रुपये किंमतीचे विम्याचे काम पूर्ण करून ठरलेल्या उद्दिष्टापेक्षाही अधिक काम केले.


**स्टँडर्ड मोटारगाड्यांचे उत्पादन**—स्टँडर्ड मोटारगाड्या तयार करण्यास आता पुन्हा प्रारंभ करण्यात येणार आहे. गेल्या जानेवारीत गाड्यांना लागणारे काही परदेशीय भाग आयात करण्यासाठी लागणारा परवाना कारखान्याला मिळाला नव्हता. त्यामुळे उत्पादन बंद ठेवावे लागले होते. ह्या गाड्यांत १५ टक्के भाग परदेशी वापरावे लागतात. ते आयात करण्यासाठी आता २५ लाख रुपयांचा परवाना देण्यात आला आहे. पुढील महिन्यापासून थोड्याबहुत प्रमाणात गाड्या तयार होऊन गिऱ्हाइकांना मिळू लागतील.

**साखर कारखान्यांचे परवाने**—साखरेच्या नव्या कारखान्यांना परवाने देण्याबाबत उत्तरप्रदेश राज्याला अन्याय करण्यात आला आहे अशी तक्रार राज्य सरकारने केली आहे. उत्तरप्रदेशाचे राज्य साखरेच्या धंद्याबाबत प्रथमपासून आघाडीवर असताना नवे परवाने देताना ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात आले, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. १९६६ च्या जानेवारी महिन्यात ८ नव्या साखर कारखान्यांना परवाने देण्यात आले. परंतु त्यांतील एकही उत्तरप्रदेश राज्याला मिळालेला नाही.

**हिऱ्यांचा साठा संपणार**—दक्षिण आफ्रिकेतील एका कोट्याधीश उद्योगपतीच्या मताने जगातील हिऱ्यांचा साठा येत्या २० वर्षांच्या अवधीत संपुष्टात येण्याचा संभव आहे. हा कोट्याधीश अनेक कंपन्यांच्या संचालक मंडळावर असून हिऱ्याच्या खाणी, कोळशाच्या खाणी, पोलाद, तांबे व बँका अशा अनेक औद्योगिक संघटनांत त्याने पैसा गुंतविलेला आहे.

**स्त्री सौंदर्याची यांत्रिक निवड नापसंत**—इंग्लंडमध्ये भरविण्यात आलेल्या एका सौंदर्यस्पर्धेत एका गणिती यंत्राच्या चालकाने यंत्राच्या साह्याने निवड केलेली सौंदर्यवती स्त्री इतर स्त्रियांना आवडली नाही. ही सौंदर्यवती स्त्री एका दंतवैद्याची स्वागत-सेविका आहे आणि तिचे वय १८ आहे. ब्रिटनमध्ये यांत्रिक मेंदूचा सौंदर्यस्पर्धेसाठी उपयोग करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. निकाल जाहीर झाल्यावर गणिती यंत्राच्या मालकावर स्त्रियांनी अपशब्दांचा भरपूर मारा केला.


कौटुंबिक
अंदाज पत्रक !




चालू महिन्याची प्राप्ती आज
हाताशी आहे. महिन्याचा खर्च
वजा जाता राहिलेली शिल्लक
बँकेत जाऊं दे.

MB

अर्थात्
बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
मध्यें, जिथे तुमची मिळकत
सुरक्षित तर राहिलच शिवाय
तुम्हाला हवा तो सल्लाहि मिळेल.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ,
पुणे-२.

## श्रीयुत कलाप्पा बाबुराव आवाडे
### चेअरमन, इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., यांचा अल्प परिचय



यांचा जन्म दिनांक २४-३-१९३१ रोजी इचलकरंजी येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे वडील के. बाबुराव आवाडे हे या भागातले एक प्रगतिशील, धडाडीचे व कष्टाळू शेतकरी म्हणून प्रसिद्ध होते. तसेच त्यांना सामाजिक कार्याची फार आवड होती व त्यांचाच वारसा घेतलेले हे त्यांचे सुपुत्र आहेत.

आपल्या वडिलांना त्यांच्या एकट्याच्या हातून शेतीचे व पॉवरलूम कारखान्याचे काम बघण्याचे अशक्य होते असे पाहताच, त्यांनी आपले शिक्षण मध्येच सोडून शेती व कारखाना याकडे लक्ष घालण्यास सुरुवात केली. हे करत असताना आपल्या वडिलांच्या सामाजिक कार्याचा वारसाहि आपल्याकडे घेतला. ते काँग्रेसचे क्रियाशील सभासद असून राजकारणातहि भाग घेत आहेत. परंतु त्यांचा विशेष ओढा सहकारी क्षेत्राकडे आहे.

ते इचलकरंजी येथील विविध कार्यकारी शेतकरी सहकारी सोसायटी, इचलकरंजी ग्राहक सहकारी सोसायटी, इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, शेतकरी सहकारी संघ, अशा अनेक सहकारी संस्थांत अतिशय मेहनतीने व तळमळीने काम करीत आहेत. ते इचलकरंजी जनता सहकारी बँकेची बँकेच्या स्थापनेपासून चेअरमनची धुरा वाहात आहेत. केवळ चार वर्षांतील बँकेची स्पृहणीय प्रगती जी झाली आहे त्यात त्यांचा वाटा फार मोठा आहे.

आज ते इचलकरंजीचे नगराध्यक्ष असून त्यांना सर्वांत तरुण व कर्तबगार नगराध्यक्ष म्हणून ओळखले जाते.

### महाराष्ट्रात ५ नवे सहकारी साखरकारखाने

महाराष्ट्र राज्यात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणारे साखरेचे ५ नवीन सहकारी कारखाने काढण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्याच्या विधिमंडळात सहकार मंत्र्यांनी सांगितली. पुणे, धुळे, सांगली, नांदेड आणि उस्मानाबाद ह्या ठिकाणी त्यांची उभारणी करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सध्या खाजगी मालकीचा असलेला एक साखर कारखाना सहकारी करण्यात येणार आहे. राज्यात सहकारी तत्त्वावर चालविण्यात येणाऱ्या ३० गिरण्या काढण्यासाठी भारत सरकारने परवानगी दिली आहे. त्यांपैकी १८ गिरण्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीची मागणीही नोंदविण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात साखरेच्या सहकारी कारखान्यानंतर सुताच्या सहकारी गिरण्या स्थापन करण्याकडे अधिकाधिक प्रवृत्ती दिसून येत आहे.

### सोने शुद्ध करण्याचा कारखाना

मद्रासजवळच्या गिंडी औद्योगिक विभागात सोने शुद्ध करण्याचा व गाळण्याचा एक कारखाना सहकारी तत्त्वावर काढण्यात येणार आहे. देशात सुवर्ण-नियंत्रण जारी झाल्यापासून सोने गाळणारे बरेच कारखाने चांदी शुद्ध करू लागलेले आहेत. गिंडी येथील कारखान्याची स्वतःची प्रयोग-शाळाही असेल.

### भारताकडून लोखंडाचे खनिज घेण्याचा करार

जपान हा देश आशियातील एक मोठा औद्योगिकदृष्ट्या प्रगत झालेला देश असला, तरी त्याला उद्योगधंदे चालू ठेवण्यासाठी औद्योगिक कच्चा माल बाहेरून आयात करावा लागतो. अशा मालात लोखंडाच्या खनिजाला महत्त्वाचे स्थान आहे. भारत आणि जपान ह्यांच्या दरम्यान अलीकडेच लोखंडाचे खनिज पुरविण्यासंबंधी एक करार करण्यात आला आहे. करारास अनुसरून जपान भारताकडून ५.२ कोटी लोखंडाचे खनिज येत्या १० वर्षांत घेणार आहे; पहिल्या दोन वर्षांत दरसाल २० लाख टन आणि पुढील आठ वर्षांत दरसाल ६० लाख टन खनिज भारताने जपानला पुरवावयाचे आहे. ओरिसामधील व मध्यप्रदेशातील लोखंडाच्या खाणींमधून हे खनिज जपानला पाठविण्यात येईल. खनिजाची वाहतूक ओरिसांतील परदीप बंदराच्या द्वारा करण्यात येईल. ह्या बंदराचा मुद्दाम विकास करण्यात आला आहे.

### वाढत्या लोकसंख्येचे नेहमीच आव्हान

भारताचे पाटबंधारे मंत्री श्री. के. एल. राव ह्यांनी लोकसभेत अशी माहिती सांगितली की, भारताची लोकसंख्या दरसाल १.२० कोटी ह्या शीघ्र गतीने वाढत आहे. ह्याचा अर्थ असा की ऑस्ट्रेलिया, सीलोन, अगर सूदान ह्यांच्या आजच्या लोकसंख्येइतकी नव्या लोकसंख्येची भर भारतात दरसाल पडत आहे. इतक्या झपाट्याने वाढणाऱ्या तोंडात अन्नाचा घास घालण्यासाठी भारताला दरसाल २० लाख एकर नवी जमीन पाटबंधाऱ्याच्या पाण्याखाली भिजविण्याची व्यवस्था करावी लागेल. हे एक मोठे आव्हानच आहे. एका मुलाचा जन्म झाला की त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी १०० रुपयांची रक्कम पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी बाजूला काढून ठेवण्यात आली पाहिजे; तरच निभाव लागेल.

### भारताच्या सहाय्यकांत अमेरिकेचे अग्रस्थान
#### एप्रिल १९५१ ते मार्च १९६५ चे आकडे

| दाता देश | कोटी रु. | एकूण मदतीशी प्रमाण % |
|---|---|---|
| अमेरिका | २१३८.३ | ५८.० |
| जर्मनी | ३००.४ | ८.२ |
| ग्रेट ब्रिटन | २५०.१ | ६.८ |
| रशिया | २४५.३ | ६.७ |
| कॅनडा | १३८.१ | ३.७ |
| जपान | ७३.४ | २.० |
| ऑस्ट्रेलिया | १४.४ | ०.४ |
| फ्रान्स | १३.० | ०.४ |
| पोलंड | ९.८ | ०.३ |
| इटली | ९.१ | ०.२ |
| झेकोस्लोव्हाकिया | ६.० | ०.२ |
| युगोस्लाव्हिया | ४.३ | ०.१ |
| नॉर्वे | ३.९ | ०.१ |
| न्यूझीलंड | ३.७ | ०.१ |
| नेदरलँड्स | २.८ | ०.१ |
| ऑस्ट्रिया | २.६ | ०.१ |
| स्वित्झरलंड | २.० | ०.१ |
| बेल्जम | १.२ | — |
| डेन्मार्क | ०.४ | ०.१ |
| जागतिक बँक | ३५८.७ | ९.७ |
| आय. डी. ए. | ११०.७ | ३.० |
| एकूण | ३६८८.२ | १००.० |

# महाराष्ट्रातील व्यापारी शिक्षणाचे मार्गदर्शक व आद्य गुरू

## कै. प्रि. ग. कृ. उर्फ नानासाहेब भोपटकर

एफ्. सी. आय्.

पुणे येथील डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचे संस्थापक व व्यापारी शिक्षण क्षेत्रातील आद्य गुरू श्री. नानासाहेब भोपटकर यांना सोमवार दि. ४ एप्रिल १९६६ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी देवाज्ञा झाली.

बडोदे येथील कलाभुवनातून 'व्यापारी शिक्षणा'चा डिप्लोमा घेऊन बाहेर पडलेले श्री. भोपटकर यांनी पुण्यास तीन विद्यार्थ्यांवर सन १९१८ साली डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सची स्थापना केली. या व्यापारी शिक्षणाची विद्यार्थ्यांना साहजिकच त्या कालात गोडी लागणे महत प्रयासाचे काम होते.

पुण्यात भरलेली 'व्यापारी परिषद' महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध उद्योगपती कै. वालचंद हिराचंद यांचे अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीने पार पडली. त्या परिषदेचे कै. नानासाहेब हे चिटणीस व मी त्यांचा एक चाहता व इन्स्टिट्यूटमधील माजी शिष्य ह्या नात्याने त्यांचे हाताखाली काम करणारा स्वयंसेवक होतो. सदर परिषदेतच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज मुंबईची स्थापना १९२७ साली झाली. कै. नानासाहेब यांचा पुणे शहरातील व्यापारी संघटनांशी बराच दृढ संबंध असल्याने 'पुणे व्यापारी संघ' या संस्थेचे कार्य त्यांनी बरीच वर्षे केले व याच संघातील सदस्यांचे साहाय्याने त्यांनी पुणे मर्चंट्स् को-ऑप. बँक लि. ही सहकारी व्यापारी संस्था पुण्यामध्ये १९२४ साली स्थापन केली. कै. नानासाहेबांना आपल्या नामवंत विद्यार्थी वर्गाबद्दल नितांत आदर वाटत होता, इतकेच नव्हे तर ते समारंभांतून प्रामुख्याने त्यांच्या अनेकविध कार्याचा गौरव आपले भाषणांतून करीत असत. आज महाराष्ट्रभरच नव्हे तर इतर प्रांतांतूनही त्यांचा विद्यार्थीवर्ग वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकत आहे. या विद्यार्थ्यांना प्राप्त झालेला आत्मविश्वास हा कै. नानासाहेब यांचे शिक्षणाचाच परिणाम होय, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

कै. नानासाहेबांचे उभे आयुष्य म्हणजे महाराष्ट्राचा व्यापारी शिक्षणाचा चालता बोलता इतिहासच होय! १९१८ मध्ये इन्स्टिट्यूटचे स्थापनेनंतर टिळक महाविद्यालयात ते १९२० साली प्रोफेसर म्हणून काम करू लागले. १९२२ मध्ये महाराष्ट्र व्यापारी महाविद्यालयाची स्थापना केली, १९२३ मध्ये टिळक महाविद्यालयाचे आश्रयाखाली स्वदेशी औद्योगिक प्रदर्शन भरविले. १९२४ मध्ये "व्यापारी महाराष्ट्र" पाक्षिक काढले. १९२६ मध्ये कॉमर्स डिप्लोमाची परीक्षा पुण्यास घेण्याची व्यवस्था केली. १९२८ मध्ये महाराष्ट्र को-ऑप स्कूलचे प्रिन्सिपॉल म्हणून त्यांची नेमणूक झाली, १९३२ मध्ये हिंदुस्थानातील पहिला साखर कारखाना शेतकरी बंधूंच्या सहाय्याने उभारला, तोच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध माळी शुगर फॅक्टरी लि. अकलूज हा होय. त्यांनी तेथे सुमारे ८ वर्षे वेगवेगळ्या हुद्यावर कामे केली. या कालात 'डेक्कन इन्स्टिट्यूटचा' कारभार माझे सहाध्यायी श्री. शंकरराव धूपकर हे पाहात होते व आजतागायत ते इन्स्टिट्यूटचे एक विश्वस्त व सेक्रेटरी म्हणून काम पाहात आहेत. १९३९ मध्ये त्यांनी 'बँकांचे व्यवहार व साधने' हे पुस्तक लिहून एका महत्त्वपूर्ण ग्रंथाची भर मराठी आर्थिक वाङ्मयात घातली.

१९४३ पासून कै. नानासाहेब डेक्कन इन्स्टिट्यूटमध्ये पुन्हा काम पाहू लागले, ते १९६२–६३ पर्यंत. १९६३ पासून त्यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे इन्स्टिट्यूटचा कारभार जवळजवळ संपूर्णपणे आपल्या विश्वसनीय विद्यार्थ्यांवर व त्यांचे चि. अरविंदराव भोपटकर बी. ए., बी. कॉम., एलएल्. बी., प्रिन्सिपॉल यांचेवर सोपविला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे बाहेरील कामे पाहाणे जरी त्यांनी स्थगित केले होते तरी या कालात त्यांनी व्यापारी पारिभाषिक" (इंग्रजी–मराठी) कोष तयार केला. त्या कोषाचे महत्त्व व उपयुक्तता लक्षात घेऊन भारत सरकारने त्या त्यांच्या उपक्रमास रु. ५०० चे अनुदान देऊन गौरव केला.

अशा तऱ्हेने कै. नानासाहेबांनी व्यापारी शिक्षण क्षेत्रात इतिहास घडविला. या माझ्या व्यापारी क्षेत्रातील आद्य गुरूस त्रिवार वंदन करून त्यांचे आत्म्यास परमेश्वराने चिरकाल शांती देऊन आम्हा विद्यार्थीवृंदांकडून त्यांचे कार्याची दुंदुभी सर्वत्र वाजो हीच प्रार्थना.

पुणे दि. १७।४।१९६६] नी. ना. क्षीरसागर.

---

## साखरेचा साठा तुंबल्याने ओढवलेले संकट

गेल्या काही आठवड्यांपासून साखरेच्या कारखान्यांना अडचणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे आणि त्याचे कारण कारखान्यांच्या गुदामात तुंबलेला साखरेचा साठा. सुमारे २० लाख टन साखरेचा साठा गुदामात पडून राहिला आहे, असा अंदाज आहे. साखरेच्या तारणावर द्यावयाच्या कर्जावर सरकारने आणि बँकांनी नियंत्रणे घातली असल्याने बऱ्याच कारखान्यांना खेळत्या भांडवलाचा तुटवडा भासत आहे. परिणामी कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांच्या उसाची किंमत चुकती करता येणे अशक्य झालेले आहे. ह्या परिस्थितीचा विचार सरकारी वर्तुळात गेले काही दिवस चालू आहे. परिस्थितीवर योजण्यात यावयाच्या उपायांबाबत अद्याप काही निर्णय घेण्यात आलेला नसला तरी दोन दिशेने पावली टाकली जाण्याची शक्यता आहे. राज्यांना दिल्या जाणाऱ्या साखरेच्या वाट्यात वाढ केली जाण्याची शक्यता आहे, आणि साखरेच्या तारणावर देण्यात येणाऱ्या कर्जावरील निर्बंध काहीसे शिथिल करण्यात येण्याचा संभव आहे. साखर कारखान्यांना गेले दोन उत्पादक हंगाम चांगले गेल्यामुळे साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आणि त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. १९६५ च्या नोव्हेंबरच्या प्रारंभी कारखान्याजवळ ६ लाख, ७० हजार टन साखर शिल्लक होती. साखरेचे उत्पादन वाढल्यामुळे गेल्या मार्चच्या प्रारंभी साखरेचा साठा १८ लाख टनापर्यंत वाढलेला आहे. गेल्या महिन्यात त्यात आणखी २ लाख टनाची भर पडलेली आहे.

---

## दि बेळगाव बँक लि. च्या वार्षिक सभेचा वृत्तांत

दि बेळगाव बँक लि. ची ३६ वी वार्षिक सभा मंगळवार, दि. २९ मार्च रोजी भरून, तिने १९६५ वर्षाकरिता ९% करपात्र डिव्हिडंड मंजूर केले. निवृत्त होणारे दोघे डायरेक्टर्स, श्री. एस्. व्ही. कलघटगी आणि श्री. एस्. एम्. मुतुर हे श्री. बी. आर. फत्तेपूर (रामदुर्ग) ह्यांच्या पेक्षा प्रचंड मते जास्त मिळून पुनः निवडून आले. त्यानंतर भरलेल्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या सभेत श्री. बी. बी. पोतदार ह्यांची चेअरमनचे जागी व श्री. एस्. व्ही. कलघटगी यांची व्हाइस चेअरमनच्या जागी १९६६-६७ साठी निवडणूक करण्यात आली.

### बोकॅरो कारखान्याचा खर्च कमी करण्याचे प्रयत्न

बोकॅरो येथे उभारण्यात यावयाच्या चौथ्या पोलादाच्या कारखान्याचा उभारणीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने निश्चित सूचना करण्यात याव्यात असा आदेश भारत सरकारच्या पोलाद खात्याने दस्तुर आणि कंपनीला दिला आहे. दस्तुर आणि कंपनीने अलीकडे असा दावा केला होता की, ह्या कारखान्याच्या खर्चात १०० कोटी रुपयांची बचत करता येणे शक्य आहे. खर्चात बचत करण्याच्या कोणत्याही वास्तववादी सूचनेचा विचार करण्याची तयारी सरकारकडून दाखविण्यात आलेली आहे. बोकॅरो येथील कारखान्याचे बांधकाम एवढे प्रचंड आहे की, तो उभारला जात असता खर्चात कोठे व कशी बचत करता येईल ते एकसारखे डोळयात तेल घालून बघणे आवश्यक आहे. रशियाकडून आलेल्या कारखान्याच्या उभारणीसंबंधीचा अहवाल भारत सरकारने मंजूर केलेला आहे. तरी पण रशियन तज्ज्ञही कारखान्याच्या खर्चात बचत करण्याच्या प्रश्नाचा नव्याने विचार करण्यास तयार आहेत. ह्या संकल्पित कारखान्याची उत्पादनक्षमता दरसाल ४० लाख टनाच्या घरात नेईपर्यंत खर्चाचा आकडा ९२१ कोटी रुपयांपर्यंत जाईल असा रशियन तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीलाच ८०८ कोटी रुपये लागणार आहेत. कारखान्याची रचना व आराखडा असा ठेवण्यात आला आहे की, ४० लाख टनाचे वार्षिक उत्पादन ५५ लाख टनापर्यंत वाढविता यावे. दस्तुर आणि कंपनी ह्या कारखान्याबाबत भारत सरकारचे सल्लागार आहेत. त्यांनी भारत सरकारला खर्चात बचत करण्याबाबत काही निश्चित स्वरूपाच्या सूचना केल्या तर रशियन सरकारच्या विचारासाठी पाठविण्यात येतील. सूचनांचा स्वीकार रशियन तज्ज्ञांनी करणे आवश्यक आहे.

### भारतीय चित्रपटांच्या निर्यातीचे प्रयत्न

फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया संघटनेचे अध्यक्ष आणि भारतीय चित्रपट निर्यात मंडळाचे संचालक श्री. श्रीनिवासन हे अतिपूर्वेकडील देशांचा दौरा करून परत आले आहेत. भारताच्या बोलपटांना ह्या भागात निर्यात करण्यास किती वाव आहे त्यासंबंधी पाहणी करण्यासाठी त्यांनी हा दौरा काढला होता. परत आल्यावर पत्रकारांशी बोलताना त्यांनी अशी माहिती दिली की, अतिपूर्वेकडील देशांत हिंदी बोलपटांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येणार आहे. चित्रपट निर्यात मंडळ काही भारतीय चित्रपट सरळ विकतच घेईल किंवा त्यांच्या वितरणाची व्यवस्था करील. सिंगापूर आणि मलेशिया ह्या देशांतील ह्या धंद्यातील एजन्सीचा ह्या कामी उपयोग करून घेण्यात येईल. ह्या पद्धतीमुळे हिंदी बोलपटाच्या धंद्याला निर्यात मंडळाकडून काही द्रव्य साह्य मिळण्याचीही शक्यता आहे. थायलंड ह्या देशात भारतीय चित्रपटांच्या प्रसाराला चांगला वाव आहे. ह्या देशात मंडळ वितरणाची स्वतःचीच यंत्रणा उभारणार आहे. बँकॉक येथील हिंदी चित्रपट वितरक संघटनेने काही बोलपट विकत घेऊन ते दाखविण्यास प्रारंभ केला आहे. बोलपट अतिशय लोकप्रिय ठरल्यामुळे संघटना भरपूर कमाई करीत आहे. जपानमध्ये भारतीय बोलपट दाखविण्यासाठी टोकिओमधील एका निर्मात्या व वितरण कंपनीशी करार करण्यात आला. करारातील अटीप्रमाणे जपानी कंपनीने सहा हिंदी बोलपट जपानमध्ये दाखवावयाचे आहेत. येत्या नोव्हेंबर महिन्यात बँकॉक आणि टोकियो ह्या शहरांतून हिंदी चित्रपटांचा एक महोत्सव साजरा करण्याची तयारी निर्यात मंडळ करीत आहे.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.


| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... रु. | ११·६९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... रु. | १६·०७ ,, |
| ठेवी | ... रु. | ४५७·०० ,, |
| खेळते भांडवल | ... रु. | ४८५·०० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्



१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

### चित्रपट धंद्यासाठी रशियाकडून फिल्मची आयात

भारतामधील चित्रपटाच्या धंद्यासाठी लागणाऱ्या कच्च्या फिल्मचा तुटवडा तीव्रतेने भासू लागला आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन भारत सरकारने रशियाकडून फिल्मची आयात करण्यासाठी ५ लाख रुपयांचे आयात परवाने देण्याचे ठरविले आहे. चित्रपटाच्या धंद्यासाठी १ हजार फुटाच्या २० हजार रिळांची गरज आहे. त्यांपैकी ४ हजार रिळे कोडॅक कंपनी पुरविणार आहे. दुसरी एक परदेशी कंपनी ८,५०० रिळे देण्यास तयार आहे. उरलेली रिळे रशियाकडून आयात करण्यात येणार आहेत. ब्रिटन आणि अमेरिका ह्या दोन देशांतील तयार चित्रपट आयात करण्यासंबंधी भारताने करार केलेले आहेत. हे दोन देश वगळून इतर देशांकडून आयात करण्यात येणाऱ्या चित्रपटांवर मात्र निर्बंध घालण्यात येणार आहेत. ह्यापैकी काही चित्रपट दाखविण्यासारखे नाहीत.

### चौथा पंचवार्षिक कार्यक्रम आणि बेकारी

नियोजन समितीने केलेल्या अंदाजाप्रमाणे चौथ्या पंच-वार्षिक योजनेच्या अखेरीस भारतामधील बेकारांची संख्या १॥ कोटींच्या घरात जाईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर त्यांची संख्या १ कोटी, २० लाखाच्या आसपास होती, असावी. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात २१,५०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून त्यामुळे होणाऱ्या विकासाच्या कामात २ कोटी अधिक रोजगारांची सोय होईल. परंतु ह्या कार्य-क्रमाच्या अवधीत २·३ कोटी रोजगार शोधणारे नवे लोक मजूर-बाजारात उतरलेले असतील. म्हणजे, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर असलेल्या बेरोजगारांच्या संख्येत ३० लाखांची भर पडेल. भारतातील लोकसंख्या वाढण्याची गती बरीच असल्या-मुळे बेकारांना रोजगार मिळण्याची शक्यता झपाट्याने वाढत नाही.




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन दाळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४. येथे प्रसिद्ध केले